पुण्यनगरी पा. नं. २०

# मराठा आरक्षणाचा वणवा पेटणार!

## तुळजापुरात ६ मे रोजी वनवास यात्रा आंदोलनास तोंड फुटणार! ▮ ६ जून रोजी मराठा वादळ मुंबईत धडकणार

▮ धाराशिव : उठ मराठा जागा हो, वनवास आंदोलन यात्रेचा धागा हो।

उठ मराठा जागा हो, आरक्षणाचा धागा हो।।

सर्वोच्च न्यायालयाने पुनर्विचार याचिका फेटाळल्यानंतर संतप्त मराठा समाजाने आरक्षणासाठी पुन्हा एकदा जंग पुकारली आहे. सकल मराठा समाजाच्या वतीने ६ मेपासून राज्यात मराठा आरक्षण वनवास यात्रा आंदोलनाचे रणशिंग फुंकले आहे. ६ जून रोजी मराठा आरक्षण आंदोलनाचे हे तुफान मुंबई येथे धडकणार आहे. त्यामुळे राज्यात मराठा आरक्षणाचा वणवा पुन्हा एकदा पेटणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाने पुनर्विचार याचिका फेटाळल्यानंतर मराठा समाज संतप्त झाला आहे. आतापर्यंतच्या सर्वच राजकीय पक्ष, सरकारकडून आरक्षण न मिळाल्यामुळे समाजात असुरक्षिततेची भावना निर्माण झाल्याचे म्हटले जात आहे. त्याचे पडसाद उमटण्यास सुरुवात झाली आहे. सकल मराठा समाजाने पुन्हा एकदा आंदोलनाची सिंहगर्जना केली आहे. धाराशिव येथे शुक्रवारी सकल मराठा समाजाने पत्रकार परिषद घेऊन आंदोलनाचे रणशिंग फुंकले. आरक्षणाचे जनक राजर्षी शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनी, ६ मे रोजी महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवीच्या तीर्थक्षेत्र तुळजापूर येथून मराठा आरक्षण वनवास यात्रा आंदोलनास सुरुवात होणार असल्याचे सांगण्यात आले. शेकडो किलोमीटरचा प्रवास करीत मराठा आरक्षणाचे हे वादळ मुंबईमध्ये हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळादिनी, ६ जून रोजी धडकणार आहे. मराठा समाजाला हक्काचे आरक्षण लागू केल्याशिवाय सकल मराठा समाज मुंबई येथून हटणार नसल्याचे या वनवास यात्रा आंदोलनाचे संयोजक योगेश केदार, प्रतापसिंह कांचन-पाटील, सुनील नागणे व त्यांच्या सहकाऱ्यांनी स्पष्ट केले.

### यात्रा या मार्गाने मंत्रालयावर धडकणार!

तीर्थक्षेत्र तुळजापूर येथून मराठा वनवास यात्रेस प्रारंभ होणार आहे. सिंदफळ, सांगवी मार्डी, माळुंब्रा, सुरतगाव, तामलवाडी, कासेगाव, उळे, हगलूर, तळे हिप्परगा, रुपा भवानी मंदिर, चौपाडा विठ्ठल मंदिर, बाळे, कोंडी, चिंचोली, मावळेश्वर टोलनाका, लांबोटी, वडवळ, मोहोळ, यावली, चिखली, देवडी फाटा, शेटफळ, मोडनिंब, अरण, वरवड, अकुंभ, वेणेगाव फाटा, टेंभुर्णी, शिराळ, भिमानगर, सरडेवाडी, इंदापूर, गलांडवाडी, राजवडे, लोणी देवकर, पळसदेव, कोळेवाडी नं.१, डाळज नं.२, भिगवण, स्वामी चिंचोली, खडकी, रावणगाव, कुरकुंभ, पाटस, वरवंड, चौफुला, भांडगाव, यवत, कामतवाडी, म्हेत्रेवस्ती, उरळीकांचन, सोरतापवाडी, कुंजीरवाडी, लोणी काळभोर, शेवाळेवाडी, हडपसर, वाणवडी, स्वारगेट, शिवाजीनगर, बोपोडी, पिंपळे सौदागर, चिंचवड, आकुर्डी, भक्ती-शक्ती चौक, देहू रोड, सोमाटणे फाटा, वडगाव, कान्हे, कामशेत, फांगणे, कार्ला, लोणावळा, खंडाळा, खोपोली, महड फाटा, खालापूर, विणेगाव, रायती वाणखळख लोधीवली, बारवे, देरावली, पनवेल, कामोठे, खारघर, बेलापूर, जुईनगर, वाशी, मानखुर्द, चेंबूर, दादर, भायखळामार्गे मराठा वनवास यात्रा मुंबई येथे मंत्रालयावर धडकणार आहे.

---

म.टा.पु.पा.१०

# मेहतांच्या फलकांवर व्यास यांचे छायाचित्र

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

मिरा-भाईंदर महापालिकेच्या आज, शनिवारी होत असलेल्या एका कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या स्वागतासाठी माजी आमदार नरेंद्र मेहता यांच्याकडून संपूर्ण शहरात फलक लावण्यात आले आहेत. या फलकावर मेहता यांच्या विरोधी गटातील जिल्हाध्यक्ष रवी व्यास यांना स्थान देण्यात आले आहे. तर दुसरीकडे, आमदार गीता जैन यांचे छायाचित्र मात्र लावण्यात आलेले नाही.

मिरा-भाईंदर भाजपमध्ये माजी आमदार नरेंद्र मेहता यांचा एक, तर जिल्हाध्यक्ष रवी व्यास व आमदार गीता जैन यांचा दुसरा असे दोन गट आहेत. ही पक्षांतर्गत गटबाजी विविध कार्यक्रमांमधून अनेकदा समोर आली आहे. भाजपच्या बड्या नेत्यांनी ही गटबाजी संपुष्टात आणण्यासाठी अनेकदा प्रयत्न केले. मात्र त्यांना अपयश आले आहे.

आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपचे नेते विनय सहस्रबुद्धे यांनी पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती. या बैठकीला जिल्हाध्यक्ष रवी व्यास, माजी आमदार नरेंद्र मेहता व आमदार गीता जैन उपस्थित होते. यावेळी पक्षांतर्गत गटबाजी संपुष्टात आणण्यावर चर्चा झाली होती. याचा सकारात्मक परिणाम फडणवीस यांच्या उपस्थितीच्या निमित्ताने फलकांमधून दिसल्याची चर्चा आहे. माजी आमदार मेहता यांनी फडणवीस यांच्या स्वागतासाठी फलक लावले आहेत. या फलकावर रवी व्यास यांना स्थान देण्यात आले आहे. मात्र कट्टर विरोधक असणाऱ्या आमदार गीता जैन यांचा फोटो फलकावर लावलेला नाही. केवळ फडणवीस यांच्यापुढे एकजुटीचे चित्र उभे करण्यासाठी हे प्रयत्न केल्याचे बोलले जात आहे. वर्षभरापूर्वीदेखील फडणवीस यांच्या दौऱ्यावेळी अशीच एकजूट स्थानिक पदाधिकाऱ्यांनी दाखवली होती.

### गीता जैन यांचे छायाचित्र नाही

---

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

भाईंदरमध्ये अल्पवयीन मुलीला पाहून अश्लील कृत्य करणाऱ्या एकावर नुकताच गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही व्यक्ती पीडित मुलगी कामानिमित्त घराच्या खिडकीत आल्यावर समोरच्या घरातून वारंवार अश्लील कृत्य करत होता. या प्रकाराची पीडित मुलीच्या आईने तक्रार दाखल केली होती.

भाईंदरच्या नवघर परिसरात सातवीत शिकणारी मुलगी घराच्या खिडकीत कामानिमित्त गेल्यावर समोरच्या वास्तूमधील पहिला मजल्यावरील खिडकीत एक इसम अश्लील कृत्य करत होता. पीडित मुलीने कंटाळून ही घटना तिच्या आईला काही दिवसांपूर्वीच सांगितली होती. गुरुवारी मुलगी कामानिमित्त खिडकीजवळ गेली. यावेळी पुन्हा अज्ञात इसमाने अश्लील कृत्य केले. याची माहिती पीडित मुलीने आईला कामावरून परतल्यानंतर दिली. मुलीच्या आईने नवघर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानुसार एका ४५ वर्षीय व्यक्तीविरोधात नवघर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

Scanned with CamScanner

लोकसत्ता पा.नं. १२.

# विजय वल्लभ दुर्घटनेतील पीडित अद्याप न्यायाच्या प्रतीक्षेत



## रविवारी दुर्घटनेला दोन वर्षे पूर्ण

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** विरारच्या विजयवल्लभ रुग्णालयाला लागलेल्या भीषण आगीला रविवारी (२३ एप्रिल) रोजी दोन वर्षे पूर्ण होत आहेत. या दुर्घटनेचा चौकशी अहवाल दोन वर्षांपासून गोपनीय ठेवण्यात आला आहे. न्यायालयीन प्रक्रिया संथगतीने सुरू असून रुग्णालयाकडूनही पीडितांच्या कुटुंबीयांना कुठल्याही प्रकारची नुकसानभरपाई मिळालेली नसल्याने पीडितांच्या कुटुंबीयांनी खंत व्यक्त केली आहे.

विरार पश्चिमेला असणाऱ्या विजय वल्लभ रुग्णालयाला २३ एप्रिल २०२१ च्या पहाटे साडेतीन वाजता आग लागली होती. या रुग्णालयात करोनाचे रुग्ण उपचार घेत होते. आगीमुळे अतिदक्षता विभागातील १६ रुग्णांचा होरपळून मृत्यू झाला होता.

या आग दुर्घटनेच्या चौकशीसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. त्यात पालिका आयुक्त, मुख्य अग्निशमन अधिकारी, पोलीस आदींचा समावेश होता. या समितीने चौकशी करून अहवाल गोपनीय ठेवण्यात आला आहे. माहिती अधिकारातदेखील तो अहवाल गोपनीय असल्याचे कारण देऊन देण्यात येत नव्हता.

सामाजिक कार्यकर्ते चरण भट यांनी या अहवालबाबत माहिती अधिकाराअंतर्गत माहिती मागवली होती. मात्र त्यांनादेखील माहिती अधिकार २००५ मधील नियम ८ (अ) अन्वये सदरची माहिती देऊ शकत नसल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे भट यांनी या उत्तराला आव्हान (प्रथम अपील) दिले होते. त्यात जिल्हाधिकारी कार्यालयातील जनमाहिती अधिकाऱ्यांना प्रतिवादी करण्यात आले होते. नोव्हेंबर २०२२ मध्ये त्याची सुनावणी नुकतीच जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली होती. युक्तिवादानंतर भट यांचे अपील अंशतः मान्य करण्यात आले आहे. या संदर्भात हा गोपनीय अहवाल खुला करावा अथवा नाही याबाबत नगरविकास खात्याच्या प्रधान सचिवांचा अभिप्राय मागविण्यात आला होता. मात्र अद्याप हा अभिप्राय देण्यात आला नाही आणि अहवालही खुला करण्यात आला नाही. सत्य दडपण्यासाठी मागील दोन वर्षांपासून ही टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप याचिकाकर्ते भट यांनी केला आहे.

### रुग्णालयाकडून मदत नाही

मला रात्री इंजेक्शन देण्यात आले होते. मी अर्धवट झोपेत असताना धुरामुळे जागा झालो. अंगात अशक्तपणा होता तरी बळ एकवटून खाली आलो आणि या दुर्घटनेतून वाचलो, असे या दुर्घटनेतून बचावलेले विरारचे महेश भोईर यांनी सांगितले. माझा पुनर्जन्म झाला, असे त्यांनी सांगितले. मृताच्या नातेवाईकांना वसई विरार महापालिका आणि राज्य शासनातर्फे प्रत्येकी ५ लाख रुपये, तर केंद्र शासनातर्फे २ लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली आहे. मात्र रुग्णालयाकडून काहीही मदत देण्यात आली

पुण्यनगरी पु.पा.४

## १५ दिवसांत मागण्या मान्य न झाल्यास अधिकाऱ्यांना कार्यालयात डांबून ठेवण्याचा इशारा

# वसई-विरार पालिकेवर सेनेचा हंडा मोर्चा



**नालासोपारा :** वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'जी' मध्ये जनतेला सोसाव्या लागणाऱ्या पाण्याच्या अनेक समस्यांसाठी महिला आघाडीच्या जिल्हा संघटक नम्रता वैती यांच्या नेतृत्वाखाली पालघर जिल्हा, शिवसेना, युवासेनातर्फे घेराव तथा धरणे आंदोलन करण्यात आले. जी प्रभागातील जनतेचे पाण्याचे प्रश्न सोडवण्यासाठी निष्क्रिय असणाऱ्या प्रशासनाला जागे करण्यासाठी उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने पाण्यासाठी हंडा मोर्चा काढला. जर १५ दिवसांत मागण्या मान्य न झाल्यास पालिका अधिकाऱ्यांना कार्यालयात डांबून ठेवू आणि पालिकेच पाणी कनेक्शन तोडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी वालिवच्या कार्यालयावर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) च्या पालघर जिल्हा महिला संघटक नम्रता वैती ठाकूर यांच्या नेतृत्वात शेकडो शिवसैनिक, महिला, युवा यांनी प्रभागातील अनियमित पाणीपुरवठा, पाण्याचे ढिसाळ नियोजन, नळजोडण्या, पाणी सोडण्याची अनियमित वेळ, प्रभागातील अनधिकृत वॉटर प्लॉट द्वारे पाण्याचा उपसा व विक्री, अनधिकृत बांधकाम करणारे भूमाफियांद्वारा बुजवले जाणारे पाण्याचे स्तोत्र या मुद्द्यांवर हंडा मोर्चाचे आयोजन केले होते. या हंडा मोर्चामध्ये स्थानिक महिलांनी मोठ्या प्रमाणावर महापालिकेबाहेर जमून महापालिकेच्या निषेधाच्या घोषणा दिल्या.

नम्रता वैती यांच्या नेतृत्वात शेकडो महिला डोक्यावर हंडा घेऊन आंदोलनात सहभागी झाल्या. या आंदोलनाला सामोरे गेलेले सहाय्यक आयुक्तांनी आंदोलनकरांच्या बऱ्याच मागण्या मान्य करून कारवाई करण्याचे आश्वासन दिले. या आंदोलनाचे निवेदन सहाय्यक आयुक्तांना देऊन आठवड्याभरात कारवाई न झाल्यास महापालिकेला टाळे ठोकण्याचा तसेच उपोषण करण्याचा इशारा नम्रता वैती यांनी दिला. सदर आंदोलनात शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) उपजिल्हाप्रमुख दिलीप चेंदवणकर, जनार्दन म्हात्रे जिल्हा सचिव ॲड. अनिल चव्हाण, काका मोटे, विश्वास किणी, युवासेनेचे अतुल मोटे, उत्तर भारतीय सेनेचे सुरेंद्रसिंग राज, शहरप्रमुख शरद गावकर, महिला आघाडी पदाधिकारी हेमलता भगत, ममता चव्हाण, साधना चव्हाण, विद्या खामकर, शाखाप्रमुख अजित पाटील उपस्थित होते.

लोकमत पा.नं.२

## बनावट वैद्यकीय परवान्यावर प्रॅक्टिस

**नालासोपारा :** विरारमध्ये बनावट वैद्यकीय व्यवसाय परवाना बाळगल्याबद्दल एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वाय.के.नगर येथील सिद्धिविनायक टॉवर, शॉप नंबर नऊ, कुबेर क्लासिक या ठिकाणी भानू चंपकलाल शहा (६५) या महिलेने गुजरात कौन्सिलचे सर्टिफिकेट व नॅचरोपॅथीचे अवैध सर्टिफिकेट जवळ ठेवून व्यवसाय सुरू केला असल्याचे निदान केंद्र विरारच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. तृप्ती प्रवीण कोकाटे यांच्या निदर्शनास गुरुवारी आले होते. नॅचरोपॅथीची प्रॅक्टिस न करता ॲलोपॅथिक व आयुर्वेदिक औषधांची व इंजेक्शन आयव्ही प्रॅक्टिस करत असल्याचे उघडकीस आल्यामुळे अर्नाळा पोलिस ठाण्यात विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वसई तहसील कार्यालयाला नोटीस

## इमारतीचा संरचना लेखापरीक्षण अहवाल मागविला

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** वसई 'आय' प्रभाग समितीअंतर्गत बेकायदा बांधकामांवर धडक कारवाईनंतर सहायक आयुक्त मोहन संखे यांनी खासगी इमारतीच्या स्ट्रक्चरल ऑडिटसाठी तब्बल २०० इमारतींना नोटिसा बजावल्या. यातून वसई तहसीलदार कार्यालयही सुटलेले नाही. या कार्यालयाची इमारत जुनी झाली असून दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे वसई तहसीलदार कार्यालयालाही नोटीस धाडण्यात आली आहे.

वसई तहसीलदार कार्यालय, पंचायत समिती कार्यालय या दोन्ही इमारतींना नोटिसा बजावण्यात आल्या असून, इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करून त्याचा अहवाल पालिकेकडे सादर करण्यास सांगण्यात आले आहे. मालमत्ता अतिधोकादायक असल्यास त्यास सी-वन प्रवर्गात नोंदविले जाते. सी-टू ए म्हणजेच धोकादायक प्रवर्गात असल्यास दोन्ही स्थितीत इमारती रिकामी करण्यासाठी आदेश देण्यात आले आहेत. याव्यतिरिक्त अहवालात दुरुस्ती नमूद झाल्यास ती तत्काळ करून घेण्याची सूचना करण्यात आली आहे.

वसई तहसीलदार कार्यालयाची इमारत खूप जुनी आहे. येथे सतत नागरिकांची वर्दळ असते. एखादा भाग कोसळल्यास जीवित, वित्तहानी होऊ शकते. त्यामुळे स्ट्रक्चरल ऑडिट होणे गरजेचे आहे. शासकीय कार्यालयाला नियमांवर बोट ठेवून नोटीस बजावल्याची पहिलीच घटना आहे.



### जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे

तहसील प्रशासनाने नेहमीप्रमाणे जबाबदारी मान्य न करता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे जबाबदारी ढकलली आहे. याबाबत नायब तहसीलदार चंद्रकांत पवार यांना विचारणा केली असता, दुरुस्त्या, अहवाल इत्यादी सार्वजनिक बांधकाम विभाग करत असते. त्यामुळे नोटीस योग्य नसल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिली.

Scanned with CamScanner

पुढारी ५-५-२०

# ऑनलाईन टी शर्ट खरेदी करणे पडले महागात

## महिलेची १ लाख ३३ हजारांची फसवणूक

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरारोड परिसरात राहणाऱ्या महिलेने ऑनलाईन ती शर्ट खरेदी केला परंतु टी शर्ट न मिळाल्याने डिलिव्हरी कंपनीला फोन केला असता तिला टी शर्ट तर मिळालाच नाही उलट तिची ऑनलाईन १ लाख ३३ हजार ५०० रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. त्या महिलेला ऑनलाईन टी-शर्ट खरेदी करणे महागात पडले आहे. याबाबत नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



शांतीनगर, मिरारोड येथे राहणाऱ्या स्तुती सुनील दोशी यांनी नायका फशन्स या साईट वरून एक टीशर्ट ऑर्डर केला होता. त्याची डिलीव्हरी पाच दिवसांनंतर मिळणार होती परंतु डिलिव्हरी मिळाली नाही. त्यामुळे गुगल वरून डिलीवरी कुरिअर कंपनीचा नंबर सर्च केला त्यावेळी एक नंबर मिळाला त्यावर फोन वरून केला असता मोबाईल त्याने त्याचे नाव, अमित सिंग असे सांगितले. अमित याने एक लिंक पाठवली व तुमचा पत्ता व्हेरिफाय होत नाही तुम्ही व्हेरिफिकेशन साठी ५ रुपये लिंकवर पाठवा असे सांगितले. अमित याने पाठविलेली लिंक दोशी ओपन करून त्यामध्ये पुर्ण माहिती भरली व पेमेंट ऑप्शन आल्यानंतर ५ रुपयांचे पेमेंट केले होते. परंतु ते पेमेंट फेल झाले त्यामुळे माझे ट्रान्झक्शन पुर्ण झाले नाही त्यामुळे मी अमित याला फोन करून माझे पेमेंट झाले नाही असे सांगितले त्यानंतर त्याने डिलीव्हरी बॉय रोहितचा मोबाईल नंबर दिला व त्याच्याशी बोलून तुमचे कुरियर घ्या असे सांगितले. त्यानंतर दोशी यांनी रोहितला फोन करून कुरियर बाबत विचारणा केली असता त्याने आज उदया तुमचे कुरियर पोचेल असे सांगितले. त्यानंतर १५ एप्रिल रोजी सायंकाळी दोशी यांच्या मोबाईलवर बँक खात्यातून पैसे डेबिट झाल्याचा मेसेज आला. त्यानंतर काही वेळात आईच्या बँक खात्यातून पैसे डेबिट झाल्याचे मेसेज आले होते.

लोकमत ५-५-२०

स्थानकावर थाबा द्यावा.

शेख व पी.डी. माने यांनी मदत केला.

# स्थानिक मच्छीमार संस्थांना बाजारात विक्रीसाठी जागा देणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदर पश्चिम येथे रोज पहाटे भरणाऱ्या घाऊक मासळी बाजारात स्थानिक मच्छिमारांच्या संस्थांना मासळी विक्रीसाठी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी गेल्या अनेक वर्षापासून केली जात आहे. बाहेरच्यांना जागा मिळते पण स्थानिकांना जागा दिली जात नसल्याने मच्छिमारांच्या शिष्टमंडळाने आयुक्तांकडे पुन्हा एकदा जागेची मागणी केली. त्यानंतर स्थानिक मच्छिमारांच्या संस्थांना घाऊक मासळी विक्रीसाठी जागा देण्याचे निर्देश आयुक्तांनी शहर अभियंता दीपक खांबित यांना दिले आहेत.

भाईंदरच्या उत्तन समुद्रकिनारी सुमारे ८०० यांत्रिकी मासेमारी नौका सहा मच्छिमार संस्थांच्या माध्यमातून मासेमारी करतात. संस्थांच्या मच्छिमार सभासदांची मासळी संस्थेमार्फत विकली जावी, अशी शासनाची अट असली तरी मासळी विकायची कुठे, असा प्रश्न संस्थांना पडतो. घाऊक भावात मासळी विक्रीचा बाजार भाईंदर पश्चिमेस रेल्वे स्थानकाजवळ रस्त्यावर पहाटे भरतो. सदर बाजारात स्थानिक महिलांसह बाहेरून येणारे तसेच परप्रांतीय मोठ्या संख्येने मासळी विक्रीला येत असतात.

रस्ता आणि जागा पालिकेची असूनदेखील मासळी लिलावात अडते - दलाल हेच जागा अडवून मच्छिमारांच्या मासळी विक्रीत कमिशन घेतात शिवाय काही मासळी काढून घेत असल्याचे आरोप मच्छिमारांच्या नेत्यांकडून सातत्याने होतो. त्यामुळेच त्यांनी आयुक्तांकडे जागेची मागणी केली होती.

मच्छिमार नेते तथा पाली सोसायटी अध्यक्ष बर्नड डिमेलो, माजी नगरसेविका शर्मिला बगाजी, उत्तन सोसायटी संचालक डेनिस नून, माल्कम भंडारी, ऑस्टिन बोटेचा, विकास सोसायटीचे अँटोनी तान्या, चौक सोसायटी अध्यक्ष विल्यम गोविंद व अन्य मच्छिमारांनी भाईंदर बाजारात मच्छिमार संस्थांच्या नावाने मासळी विक्रीसाठी जागा देण्याची मागणी केली. मच्छिमारांच्या संस्थांना मासळी विक्रीसाठी जागा मिळाल्यास अनेकांची लूट थांबेल, असे बर्नड डिमेलो म्हणाले.

Scanned with CamScanner

पुढारी पा. नं. ८०

# फायनान्स कंपनी, ग्राहकांची फसवणूक करून दुचाकी विकणाऱ्या तिघांना अटक

## २१ लाख ४० हजार रुपयांच्या ३४ दुचाकी जप्त



मिरारोड : पुढारी वृत्तसेवा

नालासोपारा पोलीस ठाणे हद्दीत फायनान्स कंपनी व ग्राहकांची फसवणुक करून दुचाकी विक्री करणाऱ्या नालासोपारा पोलीस ठाणे व गुन्हे शाखा कक्ष २ वसई यांनी संयुक्त कारवाई करून तिघांना अटक केली आहे. त्यांच्याकडून २१ लाख ४० हजाराच्या ३४ दुचाकी जप्त केल्या आहेत. या कारवाईमुळे मोठे रॅकेट उजेडात आले असून अनेक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

नालासोपारा पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या संकेत विष्णु मोहिते यांना त्यांच्या दुचाकी स्कुटरचे लोनचे हप्ते प्रलंबित असल्याचे कारण सांगून पॉल नाहर याने २२ डिसेंबर २०२२ रोजी स्कूटर एल. अ‍ॅण्ड. टी. या फायनान्स कंपनीमध्ये जमा करावयाची आहे असे सांगुन ती स्कुटर कंपनीमध्ये जमा न करता ती परस्पर विक्री करून त्यांचे स्कुटरचा अपहार करून फसवणुक केल्याबाबत १४ एप्रिल २०२३ रोजी नालासोपारा पोलीस ठाण्यात भा.दं.वि.सं. कलम ४२०, ४०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. हा गुन्हा उघडकीस आणण्याबाबत वरिष्ठांनी सुचना दिल्या होत्या. त्यानुसार नालासोपारा पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार तसेच गुन्हे शाखा कक्ष २ वसई हे समांतर तपास करत होते. या गुन्ह्याचा तपास करून आरोपी पॉल मुर्गन अनबलगन नाहर , सलमान हनीफ शेख , सुधांशु ममुराली कनोजिया सर्व रा. नालासोपारा यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडे तपास केला असता आरोपी यांनी आप आपसात संगणमत करून हा गुन्हा केल्याचे उघडकीस आले. गुन्हा केल्याचे उघडकीस आल्याने त्यांना अटक करण्यात आली आहे. अटक आरोपी यांचेकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी अशाच प्रकारच्या अनेक दुचाकी परस्पर विक्री केल्याचे सांगितले.

आरोपी यांनी परस्पर अपहार केलेल्या व विक्री केलेल्या १० लाख ९० हजार रुपयांच्या एकूण १७ दुचाकी नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने जप्त केल्या आहेत. तसेच गुन्हे शाखा कक्ष २, वसई पथकाने १० लाख ५० हजार रुपये किंमतीच्या १७ दुचाकी जप्त केलेल्या आहेत.

अशा प्रकारे दोघांनी केलेल्या संयुक्त कारवाईमध्ये आतापर्यंत एकुण २१४०००० रुपये किमतीच्या ३४ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. ही कारवाई वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली नालासोपारा पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विलास सुपे, पोलीस निरीक्षक राहुल सोनावणे गुन्हे, सहाय्यक पोलीस निरीक्षक पंडित मस्के, अमोल तळेकर, पोलीस हवालदार किशोर धनु, सचिन कांबळे व अन्य पोलीस पथकांनी केली आहे.

Scanned with CamScanner

पुढारी पा.नं.५

# भाईंदर ते वसई रो-रो सेवा जूनपर्यंत सुरू होणार

## खासदार राजन विचारे यांची माहिती

**भाईदर : पुढारी वृत्तसेवा**

ठाणे लोकसभा मतदार संघांचे खा. राजन विचारे यांनी आपल्या मतदार संघातील ठाणे, नवी मुंबई व मीरा-भाईंदर या तीन महानगरपालिका क्षेत्रात जोडणाऱ्या जलमार्गासाठी रो-रो सेवा सुरु केली जाणार आहे. त्याचा आढावा घेण्यासाठी दोन दिवसांपूर्वी मुंबईच्या महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी विचारे यांनी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड मार्फत नव्याने सुरू होणाऱ्या प्रवाभाईदर ते वसई दरम्यानच्या रो-रो सेवा सुरु करण्याबाबतचा प्रश्न उपस्थित केला. त्यावर मेरीटाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी येत्या जून पर्यंत हि सेवा सुरु होणार असल्याचे सांगितल्याची माहिती विचारे यांनी दिली.

यामुळे दोन शहरांमधील अंतर कमी होणार आहे. राष्ट्रीय जलमार्ग क्रमांक ५३ मधील पहिल्या टप्प्यातील कोलशेत, काल्हेर, मीरा भाईंदर-जैसल पार्क तसेच डोंबिवली या जेट्टीची कामे सुरू करण्यास विलंब होत असल्याचा मुद्दा विचारे यांनी बैठकीत उपस्थित केला. यावर मेरीटाईम बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमित सैनी यांनी या जेट्टीची कामे सुरू करण्यासाठी निविदा काढण्यात आली होती. परंतु प्रतिसाद न मिळाल्याने पुन्हा निविदा प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच दुसऱ्या टप्प्यातील ऐरोली येथील जैवविविधता केंद्रालगतची जेट्टी विकसित करण्यात यावी, अशी मागणीकेली होती. त्यावर कोणती कार्यवाही करण्यात आल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला असता या कामासाठी ३२ कोटी ८५ लाखांच्या रक्कमेचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी राज्य शासनाकडे पाठविण्यात आल्याचेमेरीटाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

### वसई येथील जेट्टीचे ७० टक्के काम पूर्ण



केंद्र व राज्य शासनाच्या सहकायनि येथील जेट्टीकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम सुरु असून पर्यटकांच्या मनोरंजनासाठी वॉटर स्पोर्ट्स, फेरी बोट सुरु करण्यासाठी इच्छुकांकडून माहिती घेण्यात येत आहे. विचारे यांच्या प्रयत्नाने भाईदर ते वसई रो- रो सेवा येत्या जूनपर्यंत सुरु करण्यात येणार असल्याने या दोन शहरांमध्ये ये-जा करण्यास काही मिनिटांचाच कालावधी प्रवासाकरीता लागणार आहे. सध्या या दोन्ही शहरातील प्रवासाकरीता मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरून सुमारे ४० किमीचे अंतर कापावे लागते. हे अंतर काही मिनिटांवर येणार असल्याने इंधनाची व वेळेची मोठी बचत होणार असल्याचे विचारे यांनी सांगितले. वसई येथील जेट्टीचे ७० टक्के काम पूर्ण झाले असून जून अखेर पर्यंत जय भवानी कंपनी मार्फत बोट सेवा सुरू करण्याचे नियोजन मेरीटाईम बोर्डाकडून करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

याचप्रमाणे ठाणे व ऐरोली या खाडी दरम्यान जलवाहतुकीला अडथळा ठरणारा रॉक ड्रेजिंग करण्यासाठी ४४० कोटींच्या प्रस्तावाला नुकतीच प्रशासकीय मान्यता मिळाली असून याचेही काम लवकर सुरु होणार असल्याची माहिती विचारे यांना देण्यात आली.

Scanned with CamScanner

नवभारत

## नालासोपारा क्राइम ब्रांच की कार्रवाई, 21.40 लाख के 34 दो पहिया बरामद

# झांसा देकर लोगों को ठगने वाले अरेस्ट

■ वसई, नवभारत न्यूज नेटवर्क. फाइनेंस कंपनियों और ग्राहकों से ठगी कर दो पहिया वाहन बेचने वाले 3 आरोपियों को पकड़ने में नालासोपारा अपराध शाखा यूनिट 2 की टीम ने सफलता प्राप्त की है. पुलिस ने तीनों आरोपियों को अरेस्ट कर 21 लाख 40 हजार रुपये मूल्य के 34 दो पहिया वाहनों को जब्त किया है. पकड़े गए तीनों आरोपियों के रिकवरी एजेंट होने का मामला सामने आया है. आगे भी कई दो पहिया वाहन जब्त किए जाएंगे. इस बात की जानकारी पुलिस ने दी है. बताते हैं कि नालासोपारा निवासी संकेत विष्णु मोहिते ने लोन निकाल कर दो पहिया वाहन को खरीदा था. 22 दिसंबर को जब वह बाइक से घर जा रहा था तो आरोपी पॉल नादर ने कहा कि बाइक लोन की किश्तें बकाया हैं. साथ ही कहा कि गाड़ी को कंपनी में जमा करना है, लेकिन उसने वाहन को दूसरे के हाथ बिक्री कर धोखाधड़ी की थी, जिसकी शिकायत 14 अप्रैल को दर्ज कर अपराध शाखा ने जांच शुरू की.



*जिन नागरिकों ने लोन के माध्यम से दोपहिया वाहन को खरीदा है. ऐसे ग्राहकों के पास यदि रिकवरी एजेंट आते हैं, तो गाड़ी जमा करते वक्त सरेंडर फॉर्म की कॉपी पुलिस स्टेशन में अवश्य जमा करना बेहद जरूरी है, ताकि लोगों के साथ होने वाली धोखाधड़ी से बचा जा सके.*

*– सुहास बावचे, वरिष्ठ पुलिस अधिकारी*

## अपराध शाखा यूनिट 2 को मिली सफलता

मामले का खुलासा करने के लिए अपराध शाखा यूनिट दो की टीम ने जांच शुरू की. मुखबीर से मिली सूचना पर आरोपी पॉल मुर्गन अनबल्ल्गन नाडर, सलमान हनीफ शेख और सुधांशु को 16 अप्रैल को हिरासत में लिया. पूछताछ में जानकारी मिली कि पकड़े गए आरोपियों ने आपस में मिलकर इस घटना को अंजाम दिया है, जिसके बाद पुलिस ने सभी को गिरफ्तार कर लिया है. गिरफ्तार आरोपियों से आगे की पूछताछ करने पर पता चला कि उन्होंने एक जैसे कई दोपहिया वाहन एक दूसरे को बेचे थे. आरोपियों के अनुसार उन्होंने कुल 34 दो पहिया वाहन बेचे हैं.

Mumbai Edition
22-april-2023 Page No. 15
epaper.enavabharat.com

Scanned with CamScanner

# Dance bar raided, 7 women rescued

**SURESH GOLANI**
MIRA-BHAYANDAR

The Anti Human Trafficking Unit (social service branch) of the Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police raided a Mira Road orchestra bar found to be indulging in vulgar dance performances under the guise of music shows late on Wednesday night.

Based on specific information about girls dancing and patrons showering money at Sona Palace Bar (Hotel Bhaargav Palace), a decoy recorded the act before a police team swooped down on it at around 11pm.

While seven women were rescued, eight people, including the manager, soliciting customers and other staffers of the establishment were taken into custody. The team also recovered Rs33,200 in cash.

A case under various sections of the Maharashtra Prohibition of Obscene Dance in Hotels, Restaurants and Bar Rooms and Protection of Dignity of Women Act, 2016, has been registered at the Mira Road police station against the accused.

The act has stringent guidelines and convictions in such cases, which are punishable with five-year imprisonment or a fine of Rs25 lakh, or both. However, the owners and operators who are the actual beneficiaries of the illicit trade are yet to be arrested.

Scanned with CamScanner

पुढारी

# ऑनलाईन टी शर्ट खरेदी करणे पडले महागात

## महिलेची १ लाख ३३ हजारांची फसवणूक

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरारोड परिसरात राहणाऱ्या महिलेने ऑनलाईन ती शर्ट खरेदी केला परंतु टी शर्ट न मिळाल्याने डिलिव्हरी कंपनीला फोन केला असता तिला टी शर्ट तर मिळालाच नाही उलट तिची ऑनलाईन १ लाख ३३ हजार ५०० रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. त्या महिलेला ऑनलाईन टी-शर्ट खरेदी करणे महागात पडले आहे. याबाबत नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शांतीनगर, मिरारोड येथे राहणाऱ्या स्तुती सुनील दोशी यांनी नायका फशन्स या साईट वरून एक टीशर्ट ऑर्डर केला होता. त्याची डिलीव्हरी पाच दिवसांनंतर मिळणार



होती परंतु डिलिव्हरी मिळाली नाही. त्यामुळे गुगल वरून डिलीवरी कुरिअर कंपनीचा नंबर सर्च केला त्यावेळी एक नंबर मिळाला त्यावर फोन वरून केला असता मोबाईल त्याने त्याचे नाव अमित सिंग असे सांगितले. अमित याने एक लिंक पाठवली व तुमचा पत्ता व्हेरिफाय होत नाही तुम्ही व्हेरिफिकेशन साठी ५ रुपये लिंकवर पाठवा असे सांगितले. अमित याने पाठविलेली लिंक दोशी ओपन करून त्यामध्ये पुर्ण माहिती भरली व पेमेंट ऑप्शन आल्यानंतर ५ रुपयांचे पेमेंट केले होते. परंतु ते पेमेंट फेल झाले त्यामुळे माझे ट्रान्झक्शन पुर्ण झाले नाही त्यामुळे मी अमित याला फोन करून माझे पेमेंट झाले नाही असे सांगितले त्यानंतर त्याने डिलीव्हरी बॉय रोहितचा मोबाईल नंबर दिला व त्याच्याशी बोलून तुमचे कुरियर घ्या असे सांगितले. त्यानंतर दोशी यांनी रोहितला फोन करून कुरियर बाबत विचारणा केली असता त्याने आज उदया तुमचे कुरियर पोचेल असे सांगितले. त्यानंतर १५ एप्रिल रोजी सायंकाळी दोशी यांच्या मोबाईलवर बँक खात्यातून पैसे डेबिट झाल्याचा मेसेज आला. त्यानंतर काही वेळात आईच्या बँक खात्यातून पैसे डेबिट झाल्याचे मेसेज आले होते.

Thane Edition
Apr 22, 2023 Page No. 10
newspaper.pudhari.co.in

Scanned with CamScanner

पुढारी

# फायनान्स कंपनी, ग्राहकांची फसवणूक करून दुचाकी विकणाऱ्या तिघांना अटक

## २१ लाख ४० हजार रुपयांच्या ३४ दुचाकी जप्त



**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

नालासोपारा पोलीस ठाणे हद्दीत फायनान्स कंपनी व ग्राहकांची फसवणुक करून दुचाकी विक्री करणाऱ्या नालासोपारा पोलीस ठाणे व गुन्हे शाखा कक्ष २ वसई यांनी संयुक्त कारवाई करून तिघांना अटक केली आहे. त्यांच्याकडून २१ लाख ४० हजाराच्या ३४ दुचाकी जप्त केल्या आहेत. या कारवाईमुळे मोठे रॅकेट उजेडात आले असून अनेक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

नालासोपारा पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या संकेत विष्णु मोहिते यांना त्यांच्या दुचाकी स्कुटरचे लोनचे हप्ते प्रलंबित असल्याचे कारण सांगून पॉल नाहर याने २२ डिसेंबर २०२२ रोजी स्कूटर एल. अँण्ड. टी. या फायनान्स कंपनीमध्ये जमा करावयाची आहे असे सांगुन ती स्कुटर कंपनीमध्ये जमा न करता ती परस्पर विक्री करून त्यांचे स्कुटरचा अपहार करून फसवणुक केल्यावाबत १४ एप्रिल २०२३ रोजी नालासोपारा पोलीस ठाण्यात भा.दं.वि.सं. कलम ४२०, ४०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. हा गुन्हा उघडकीस आणण्याबाबत वरिष्ठांनी सुचना दिल्या होत्या. त्यानुसार नालासोपारा पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार तसेच गुन्हे शाखा कक्ष २ वसई हे समांतर तपास करत होते. या गुन्हयाचा तपास करून आरोपी पॉल मुर्गन अनबलगन नाहर , सलमान हनीफ शेख , सुधांशु ममुराली कनोजिया सर्व रा. नालासोपारा यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडे तपास केला असता आरोपी यांनी आप आपसात संगणमत करून हा गुन्हा केल्याचे उघडकीस आले. गुन्हा केल्याचे उघडकीस आल्याने त्यांना अटक करण्यात आली आहे. अटक आरोपी यांचेकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी अशाच प्रकारच्या अनेक दुचाकी परस्पर विक्री केल्याचे सांगितले.

आरोपी यांनी परस्पर अपहार केलेल्या व विक्री केलेल्या १० लाख ९० हजार रुपयांच्या एकूण १७ दुचाकी नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने जप्त केल्या आहेत. तसेच गुन्हे शाखा कक्ष २, वसई पथकाने १० लाख ५० हजार रुपये किंमतीच्या १७ दुचाकी जप्त केलेल्या आहेत.

अशा प्रकारे दोघांनी केलेल्या संयुक्त कारवाईमध्ये आतापर्यंत एकुण २१४०००० रुपये किमतीच्या ३४ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. ही कारवाई वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली नालासोपारा पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विलास सुपे, पोलीस निरीक्षक राहुल सोनावणे गुन्हे, सहाय्यक पोलीस निरीक्षक पंडित मस्के, अमोल तळेकर, पोलीस हवालदार किशोर धनु, सचिन कांबळे व अन्य पोलीस पथकांनी केली आहे.

Thane Edition
Apr 22, 2023 Page No. 10
newspaper.pudhari.co.in

Scanned with CamScanner

# आनलाइन साइबर क्राइम रोकने के लिए मीरा-भाईंदर आयुक्तालय द्वारा विशेष अपील



गणेश पाण्डेय

भाईंदर। मौजुदा दैनिक जीवन में हर शख्स एक दूसरे से संवाद करने के लिए वाट्सप एप्स का उपयोग बडे पैमाने पर करते हैं। इसी को ध्यान में रखते हुए साइबर अपराधी वाट्सप के जरिए तरह-तरह के हथकंडे अपनाते हैं। वे सामान्य रूप से आम लोगो को को ठगने के लिए तरह-तरह के हथकंडे अपना रहे हैं। इसमें मुख्य रूप से और वर्तमान में एक प्रकार प्रतिष्ठित कंपनियों के सीईओ,वरिष्ठ अधिकारियों, उच्च पदस्थ अधिकारियों की तस्वीरों का उपयोग है वीपीएन नंबरों का उपयोग करके वाट्सप के माध्यम से नागरिकों के साथ चैट करके विश्वास हासिल करते है।विभिन्न ई-कॉमर्स वेबसाइटों/ऐप्स जैसे फ्लिपकार्ट, अमेज़ॅन, पेटीएम के माध्यम से उपहार देना तब ज्यादा जोखिम पूर्ण है जब साइबर अपराधी चैट कर रहे हों कार्ड या एप्पल उपहार कार्ड धोखा अक्सर सामने आते है।हालांकि साइबर क्राइम सेल ने अपने कार्यक्षेत्र के नागरिकों द्वारा बरती जाने वाली कुछ सावधानियां सुझायी है। 1. अगर कोई अजनबी व्हाट्सएप पर चैट कर रहा है तो उसे जवाब न दें। 2.अपने व्हाट्सएप पर टू-स्टेप वेरिफिकेशन सेटिंग को इनेबल करें। 3.अगर वाट्सप पर किसी परिचित या अजनबी से गिफ्ट कार्ड के लिए अनुरोध किया गया है फोन से व्यक्ति से संपर्क करना सुनिश्चित करें। 4. अपना वाट्सप सुरक्षा कोड किसी के मांगने पर उसे न दें. 5. अनजान लिंक पर क्लिक करने से पहले सोच लें। 6.व्यक्तिगत या वित्तीय जानकारी जैसे बैंक कार्ड विवरण, पिन, ओटीपी पासवर्ड आदि किसी के साथ साझा कतई न करें। हालांकि मीरा-भाईंदर, वसई-विरार शहरों के नागरिकों को पहले भी इस तरह के जागरूकता कार्यक्रम से उन्हे अगाह किया गया है कि फिर भी समय समय पर साइबर क्राइम सेल, मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय इस तरह की धोखाधड़ी के प्रति सतर्क रहने की सार्वजनिक अपील शहर के लोगो से पुन: करता है।साथ ही इस तरह से किसी भी तरह की धोखाधड़ी होने पर तुरंत नजदीकी पुलिस थाने या साइबर क्राइम को सूचना दें और www.cybercrime.gov.in या 1930 हेल्पलाइन पर संपर्क कर शिकायत करें।

3/8



Scanned with CamScanner

# फसवणुक करून दुचाकी विक्री करणाऱ्या आरोपींना अटक

**नालासोपारा :** नालासोपारा पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात दिनांक २२/१२/२०२२ रोजी फिर्यादी नामे संकेत विष्णु मोहिते, रा. नालासोपारा हे त्यांचे अक्टीवा मोटार स्कुटरवरून घरी जात असताना इसम नामे पॉल नाडर यांनी फिर्यादीचे मोटार स्कुटरचे लोनचे हप्ते प्रलंबित असल्याचे कारण सांगुन फिर्यादीची स्कुटट एल. अँड. टी. या फायनान्स कंपनीमध्ये जमा करावयाची आहे असे सांगुन नमुद स्कुटर ही कंपनीमध्ये जमा न करता ती परस्पर विक्री करून त्यांचे स्कुटरचा अपहार करून फसवणुक केलेबाबत फिर्यादी यांनी दिनांक १४/०४/२०२३ रोजी तक्रार दिल्याने नालासोपारा पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. १ २१७/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ४२०, ४०६, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हा उघडकीस आणणेबाबत वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे नालासोपारा पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार तसेच गुन्हे शाखा कक्ष २ वसई हे समांतर तपास करीत होते. सदर गुन्हयाबाबत गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाव्दारे प्राप्त माहितीच्या आधारे आरोपी नामे १) पॉल मुर्गन अनबल्लगन नाडर २) सलमान हनीफ शेख ३) सुधांशु ममुराली कनोजिया सर्व रा. नालासोपारा यांना ताब्यात घेवनु तपास केला असता सदर अरोपीत यांनी आपसात संगणमत करुन वा नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना दिनांक १६/०४/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे. अटक आरोपीत यांचेकडे अधिक विचारपुस करता त्यांनी अशाच प्रकारच्या अनेक दुचाकी परस्पर विक्री केल्याचे तपासादरम्यान निष्पन्न झाल्याने सदर अरोपीत यांनी परस्पर अपहार केलेल्या व विक्री केलेल्या १०,९०,०००/- रुपये किंमतीच्या एकुण १७ दुचाकी हस्तगत करण्यात आलेल्या आहेत तसेच गुन्हे शाखा कक्ष २, वसई यांचेकडून एकुण १०,५०,०००/- रुपये किंमतीच्या १७ दुचाकी हस्तगत करण्यात आलेल्या आहेत. अशा प्रकारे करण्यात आलेल्या संयुक्त कारवाई दरम्यान आतापर्यंत एकुण ३४ दुचाकी किंमत रुपये २१,४०,०००/- हस्तगत करण्यात यश मिळवलेले आहे.



सदरची कामगिरी मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त, अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०३, विरार, अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे), चंद्रकांत जाधव, सहायक पोलीस आयुक्त, नालासोपारा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली नालासोपारा पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक विलास सुपे, पो. नि. राहुल सोनावणे गुन्हे, स.पो.नि. पंडीत मस्के, अमोल तळेकर, पो. हवा. किशोर धनु, सचिन कांबळे, पो.ना. प्रशांत साळुंखे, अमोल तटकरे, पो.अंम. कल्याण बाचकर, राजेश नाटुलकर, पोना/ढोणे नेम. पोलीस उप आयुक्त कार्यालय, म.सु.ब. मनोज पाटील तसेच गुन्हे शाखा कक्ष २, वसईचे पो.नि. श्री. शाहुराज रणवरे, स.पो.नि. सुहास कांबळे, सागर शिंदे, स.फौ. संजय नवले, मंगेश चव्हाण, रमेश भोसले, पो.हवा. चंदन मोरे, महेश पागधरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, रमेश आलदर, सुधीर नरळे, दादा आडके, पो.ना. प्रशांत ठाकुर, पो. अंम. अमोल कोरे यांनी केली आहे.

Scanned with CamScanner

लोकमत

# हजारोंचा गांजा जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : धानिवबाग येथील गावदेवी मंदिराकडे जाणाऱ्या रोडवर धानीव सुलभ शौचालयाजवळ गुरुवारी संध्याकाळी मिंटुलाल अनंतलाल श्रीवास्तव या आरोपीच्या ताब्यात गांजा हा अमली पदार्थ, रोख रक्कम व मोबाइल असा २१ हजार ४८० रुपये किमतीचा मुद्देमाल आढळला होता. पेल्हार पोलिसांनी एनडीपीएस कायद्याखाली गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 3 Apr 22, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

# वसईतून गांजा जप्त

नालासोपारा : वसईत एका आरोपीच्या ताब्यातून गांजा जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे. सातिवली मोर्या नाका येथील स्मशानभूमीसमोर गुरुवारी पहाटे तीनच्या सुमारास रब्बानी शब्बीर खाटीक (४०) याच्या ताब्यात ४ हजार ५०० रुपये किमतीचा ३५० ग्रॅम वजनाचा गांजा हा अमली पदार्थ आढळून आला होता. वालीव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 1 Apr 22, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

# उमललेली कळी फेकाल, तर दहा वर्षांचा कारावास!

## ‘मुलगा हवा’ भावना कायम : कचरा, झुडपांत स्त्री अर्भक देतात फेकून

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : 'मुलगाच हवा, मुलगी नको,' ही मानसिकता अद्यापही फारशी बदललेली नाही. त्यातच अनैतिक, विवाहबाह्य संबंधातून मुले जन्माला आली, तर त्यांना मृत्यूच्या दाढेत ढकलण्याचे प्रमाण वाढत आहे. कुकर्म समाजाच्या नजरेत येऊ नये यासाठी टोकाचे पाऊल उचलले जाते. जन्मानंतर चिमुकलींना निर्जनस्थळी, उकिरड्यावर अन् झुडपात टाकतात. मुलगी नको, या भावनेतून नवजात अर्भकांना रस्त्यावर फेकून देण्याचे धक्कादायक प्रकार समोर येत आहेत. नऊ महिने पोटात वाढल्यानंतर आपल्याच बाळाला पालक सोडून जातात. या घटना मन हेलावून टाकत आहेत. काही जण जन्माआधीच अशा कळ्या खुडतात, तर काहींना जन्मानंतर निर्जनस्थळी, उकिरड्यावर, झुडपात सोडले जाते. मात्र असे करणे कायद्याने गुन्हा असून त्यासाठी त्यासाठी दहा वर्षांचा कारावास होऊ शकतो.



### जिवंत अर्भकाला फेकल्यास दहा वर्षे तुरुंगवास

नवजात जिवंत अर्भकाला फेकून दिल्यास भारतीय दंड संहिता कलम-३१५ नुसार गुन्हा नोंद होतो. हा गुन्हा सिद्ध झाल्यास १० वर्षे तुरुंगवास, दंड किंवा दोन्ही अशी शिक्षा होऊ शकते.

### मृत अर्भक फेकल्यास दोन वर्षे शिक्षा

अर्भक मृत असल्यास किंवा त्याच्या मृतदेहाची गुप्तपणे विल्हेवाट लावल्यास भारतीय दंड संहिता कलम ३१८ नुसार गुन्हा नोंद होते. सिद्ध झाल्यास २ वर्षे शिक्षा, दंड किंवा दोन्ही होऊ शकतो.

### मागील अकरा महिन्यांत सापडले दोन अर्भक

पोलिस आयुक्तालयातील वसईत मागील ११ महिन्यांच्या कालावधीत आचोळ्यात एक पुरुष व तुळींजमध्ये एक स्त्री असे दोन अर्भक बेवारस स्थितीत सापडले होते. दोन्ही ठिकाणी पोलिसांनी गुन्हे दाखल केले होते. त्या दोन्ही अर्भकांना वाचविण्यासाठी पोलिसांना यश आले आहे.

अनैतिक संबंधातून जन्मलेल्या बाळांना समाजाच्या भीतीने उकीरड्यावर, कचऱ्यात व निर्मनुष्य जागी सोडले जाते. ही घृणास्पद बाब असून त्याऐवजी त्यांना बालगृहात ठेवावे, तेथील पाळणाघरातही ठेवले जाऊ शकते. यामुळे निष्पाप बाळांचा जीव तरी वाचेल आणि गुन्हाही दाखल होणार नाही.

- पूजा छेडा, सामाजिक कार्यकर्त्या

### ...म्हणून फेकतात अर्भक

मुले, मुली एकमेकांच्या प्रेमात पडतात. यात अल्पवयीन मुलामुलींचा समावेश असतो. शारीरिक संबंधांमुळे मुलगी गर्भवती राहते. गर्भपात करण्यास गेल्यावर सर्वांना माहीत होईल या भीतीने गर्भ वाढवला जातो. बाळाला जन्म दिल्यानंतर काही तासातच त्याला निर्जनस्थळी फेकून दिले जाते. त्यानंतर आई-वडील पसार होतात.

### सापडलेल्या जिवंत अर्भकाचे काय केले जाते?

मयत अर्भकांचे विच्छेदन केले जाते. जिवंत अर्भकावर उपचार करून प्रकृती ठणठणीत होताच त्याला शिशुगृहात पाठवले जाते. पोलिसांकडून सर्व कायदेशीर बाबी पूर्ण केल्या जातात.

### ही सामाजिक समस्या

मुलं सोडण्याचे प्रमाण वाढत असून, ही एक सामाजिक समस्या आहे. हे प्रमाण कमी करण्यासाठी पोलीस प्रयत्नशील आहोत.

- पोलिस प्रशासन



Scanned with CamScanner